# कामविश्व
## (अविवाहितांचे)

**डॉ. लीना मोहाडीकर**
लैंगिक-वैवाहिक समस्यातज्ज्ञ

**ॐ पब्लिकेशन्स्**

प्रमुख वितरक
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**कामविश्व (अविवाहितांचे) : Kamvishwa (Avivahitanche)**
डॉ. लीना मोहाडीकर

**© डॉ. लीना विलास मोहाडीकर**
२०१, बिझनेस स्क्वेअर, दुसरा मजला,
एस. पी. कॉलेजसमोर,
१६७६ सदाशिव पेठ, पुणे- ३०
फोन नं. २४४३४८४२

**प्रकाशक**
ॐ पब्लिकेशन्स्
६७८, सृष्टी विष्टा, निदान समोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. : ९६८ ९९९५ ३००

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे.

**आवृत्ती**
फेब्रुवारी, २०१३

**किंमत**
रुपये १५०/-

# प्रस्तावना

१९८६ साली 'मेनका प्रकाशन' ने 'कामविश्व' अविवाहितांचे, नवविवाहितांचे, सांसारिकांचे अशा तीन भागांत प्रसिद्ध केलं, आणि नंतरही तिन्ही पुस्तकांच्या आवृत्त्या निघाल्या. आता तीनही पुस्तकांच्या प्रती संपून अनेक महिने लोटले. वाचकांच्या आणि पुस्तक विक्रेत्यांच्या वाढत्या मागण्यांमुळे आता 'कामविज्ञान प्रकाशन' तर्फे तिन्ही पुस्तकांच्या सुधारित आवृत्त्या काही नवीन कथा-लेखांचा समावेश करून वाचकांच्या हातात ठेवताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. ॐ पब्लिकेशन्सतर्फे नवीन आवृत्ती वाचकांच्या हाती देताना आनंद होत आहे.

नवीन आवृत्तीमध्ये पुढील नवीन लेखांचा समावेश केला आहे. 'कामविश्व अविवाहितांचे'मध्ये 'हस्तमैथुनी जे रंजले-गांजले', 'ब्लॅकमेल', 'धास्ती अपूर्णत्वाची', 'चुकलेली प्रेमिका' या नवीन लेखांचा समावेश केला आहे.

'कामविश्व नवविवाहितांचे'मध्ये 'रात्र मधुचंद्राची', 'दिसतं तसं नसतं', 'मदनाचे मोजमाप', 'कुरूपता पाश दैवे ज्याचा...', 'लैंगिक गणित कच्चे ज्यांचे', 'नशा वेगळेपणाची' अशा सहा नवीन कथांचा समावेश केला आहे.

'कामविश्व सांसारिकांचे'मध्ये 'सुपातले अन् जात्यातले', 'लक्ष्मणरेषेतले व्यभिचारी', 'रडक्या पुरुषार्थाला सेक्सचा आधार', 'माघार मदनाची' आणि 'पत्नी और वो' या पाच नवीन लेखांना समाविष्ट करून घेतलं आहे.

'कामविश्व' प्रथम प्रकाशित झाल्याला आज ११ वर्षं झाली. या अकरा वर्षांत जगामध्ये समाज-जीवनाबाबतीत आणि कामजीवनाबाबतीत असंख्य घडामोडी घडल्या. दूरदर्शनसारख्या प्रसारमाध्यमाच्या प्रचंड जागतिकीकरणामुळे पाश्चिमात्त्य संस्कृतीचा प्रचंड प्रभाव जनमानसावर पडू लागला आहे. कामभावाचं

बाजारीकरण झालं आहे. जाहिराती-चित्रपटांमधून, वेगवेगळ्या दूरदर्शन कार्यक्रमांमधून, नृत्य-गाण्यांमधून सेक्सवर म्हणजे कामुक हालचालींवर वाढता भर दिला जात आहे. 'Be sexy and have sex' हीच व्यापारी नीती या सगळ्यातून लोकांच्या मनावर ठसवली जात आहे.

जिथे वस्तुविक्री आणि व्यापार वाढवण्यासाठी चंगळवाद, भोगवादच जोपासला जात आहे, तिथे आचारशुचिता, सुसंस्कार याकडे कोण लक्ष देणार? यामुळे लैंगिक शिक्षणाचा व्हावा तसा प्रसार झालेला दिसत नाही. अधून मधून शाळा-कॉलेजांमधून लैंगिक शिक्षणाच्या, एड्स प्रतिबंधाच्या चळवळी निर्माण होतात, पण त्या लगेच थंड पडतात.

गेल्या ११ वर्षांत ५/६ जागतिक परिषदांना, भारतात आणि भारताबाहेर मी हजर राहिले, शोधनिबंध सादर केले, जगभरच्या विविध लैंगिक शिक्षणतज्ज्ञांशी माझ्या ओळखी झाल्या.

११ वर्षांपूर्वी एड्सच्या इतर देशांतल्या बातम्या आपण वाचत होतो, पण आता एड्स भारतात भरपूर वाढला आहे. एड्सच्या भारतातील लागणीमध्ये आणि रुग्णांमध्ये प्रचंड वाढ सतत होत आहे.

पण म्हणून स्वैर लैंगिक संबंधांचं प्रमाण कमी झाल्याचं आढळत नाही. कारण भोगवादी वृत्तीला चंगळवाद, सतत खतपाणी घालत असतो. त्यामुळे नुसता 'safer sex', 'स्वैर संबंधात निदान निरोध तरी वापरा' एवढाच प्रचार केला जातो. मात्र या प्रचारामुळे एड्सचा प्रसार थांबेल अशा भ्रमात कोणीही राहू नये.

तर एकंदर लैंगिक बाबतीत शिस्त, संयम, अमर्यादित लैंगिक सुखासाठी मर्यादित लैंगिक स्वातंत्र्य, आपल्या सुखाचा विचार करताना समाजातल्या इतरांचं स्वास्थ्य बिघडणार नाही ना अशी काळजी घेण्याची सुजाण वृत्ती सर्वांच्या अंगी बाणवणं आवश्यक आहे, तरच 'कामविश्वा'तले असंख्य धोके टळतील हे आवर्जून सांगावंसं वाटतं.

**– डॉ. लीना विलास मोहाडीकर**

# अनुक्रमणिका


- ‘कामविश्वा’च्या मार्गदर्शनाची ही वाट वेगळी .................... ९
- हस्तमैथुनी जे रंगले-गांजले .................... १८
- खचलेलं मर्दत्व ! .................... ४२
- कामसामर्थ्याची बेडकी .................... ५२
- भयचकित करावे तुज रमणी .................... ६३
- काममोहिनी .................... ७९
- ब्लॅकमेल .................... ९७
- धास्ती अपूर्णत्वाची .................... १११
- हे बंध कामुकतेचे .................... १२२
- धिक्कारिते गर्भाशया .................... १३७
- एक दुजे के लिए ! .................... १५०
- चुकलेली प्रेमिका .................... १६७
- उतावीळ कामुका, जरा सबूर ! .................... १७७
- प्रेमरोगी .................... १८७
- षंढांचे बलात्कार .................... २०५
- विवाहाचा काममंत्र .................... २२४


✦✦

# ‘कामविश्वा’च्या मार्गदर्शनाची ही वाट वेगळी

‘‘अहो’’ मी ह्यांना स्वयंपाकाची तयारी करताना सांगू लागले.

‘‘बोला, ऐकतोय मी’’ ह्यांचं दाढी करतानाच आश्वासन.

‘‘मी विचारते त्याचं व्यवस्थित, गांभीर्यानं उत्तर द्यायचं.’’

काही वैचारिक भव्य दिव्य करण्याच्या स्थितीत माझं मन गुंतल्याने माझा आपोआपच तसा अधिकारी स्वर. पण बायकोचं बोलणं कधी विशेष गांभीर्यानं घ्यायचं नाही असा ह्यांचा तेव्हा खाक्या असल्यानं त्यांचं चेष्टामिश्रित उत्तर –

‘‘अरेच्या, गेल्याच महिन्यात तर साड्या खरेदी, मॅचिंग ब्लाऊज पिसेस, घड्याळ, शिवाय अंगठी झालीच की.’’

‘‘हेच ते,’’ मला मुद्दा सापडलाच – ‘‘बायकोने ‘अहो’ म्हटलं की ती काहीतरी नवीन मागणारच असंच तुम्हा नवऱ्यांना का वाटावं? बरं तेही एका डॉक्टर बायकोविषयी – ह्यांचंच मला आश्चर्य वाटतं. म्हणजे काहीतरी क्रांती घडवण्यासारखं मला काही बोलायचं आहे आणि तुम्ही,’’

आणि अयोग्य वेळी नको ते बोललं गेलं म्हणून मी एकदम जीभ चावलीच.

‘‘क्रांती!’’ दाढी थांबवून माझ्याकडे शोधक नजर टाकत हे म्हणाले, ‘‘क्रांती घडण्यापूर्वी पूरक अशा उत्क्रांतीच्या घडामोडी सतत घडतच असतात. फक्त त्या घटनांकडे नीट लक्ष पुरवलं जात नाही, म्हणून तर शेवटी एकदम जे परिवर्तन दिसतं, त्याला आपण क्रांती घडली असं म्हणून मोकळे होतो.’’

ह्यांचं व्यावहारिक शहाणपण बोलत होतं, आणि त्यांच्या भाष्याचं मला कौतुकही वाटलं.

पण तेवढ्यात क्रांतीवरून हे एकदम पोटाकडे बोलणं वळवत म्हणाले, ''बरं ते जाऊ दे. नाश्त्याला काय आहे आज? भूक लागलीय.''

म्हणजे मी काय विचारते आहे हे चक्क विसरल्यासारखं दाखवलं ह्यांनी.

अर्थात ह्यांचा हा 'भाव खाण्याचा' स्वभाव मला माहीत असल्याने मी त्यांच्या विषयांतराकढे दुर्लक्ष केलं. बरेच दिवस माझ्या मनात जे खदखदत होतं, ते विचारण्याची लाभलेली संधी मला आता दवडायची नव्हती.

''ऐका हो, म्हणजे मला तुम्हाला असं विचारायचं आहे की जर एखादी सुंदर आणि तरुण स्त्री काही कारणाने तुमच्या सहवासात आली, समजा तुमच्याकडे आकर्षित झाली आणि तुमचा तिच्याशी समागमही घडला तर त्या समागमाविषयी तुमची नंतर काय प्रतिक्रिया होईल? म्हणजे त्यातला आनंद, अभिमान, तृप्ती, पुरुषार्थ वगैरेंबद्दल काय वाटेल तुम्हाला?''

मी अक्षरश: शब्द जुळवतच बोलले. मनातला भाव पूर्णपणे शब्दात उतरला नव्हताच.

पण उत्तराऐवजी शांतताच पसरल्याने मी ह्यांच्याकडे पाहिलं तर हे टक लावून माझ्या चेहऱ्यावर काय भाव दिसतात ते निरखत होते. बहुधा आमच्या प्रेमविवाहानंतर जेमतेम दीड वर्षातच बायकोच्या डोक्यात नवऱ्याविषयी असा का प्रश्न आला असंच ह्यांना वाटत असावं.

''हं बोला, अन् सरळ उत्तर द्या.'' मी उत्तराची घाई करत ह्यांना चक्क ताकीदच दिली.

''लीना, तू म्हणतेस तसा प्रसंग माझ्यावर एकदा आला होता.'' हे अगदी गंभीर स्वरात सांगू लागले. आणि नकळत शंकेने माझं हृदय धडधडू लागलं. मी 'काय?' म्हणून चित्कारले सुद्धा.

''हो ना'' तोच गंभीर स्वर कायम ठेवून माझी नजर टाळीत हे म्हणाले, ''तसा जवळजवळ लैंगिक संबंधही आला असताच. पण...''

''पण काय?'' मी संशयाच्या भीतीने घेरलेच गेले.

''पण काय गं!'' गंभीर स्वरानंतर एकदम मोठ्याने हसत ते म्हणाले, ''मला तिच्याशी लग्नचं करावं लागलं.'' ह्यांचा नेहमीचा तिरकसपणा! हवा गेलेल्या फुग्यासारखी माझी स्थिती करत ह्यांनी विजयी मुद्रा केली.

''अहो, असं काय करता?''मी चक्क काकुळतीच्या स्वरात म्हणाले, ''जरा थोडं गंभीरपणे बोला ना माझ्याशी!''

''अगं, गंभीरपणे काय बोलायचं त्यात?'' शेवटी गाडी उत्तराच्या रूळावर आणत हे म्हणाले, ''त्या समागमातून कसला खरा आनंद मिळणार बोडक्याचा! हां. ती तरुण सुंदर स्त्री माझ्यावर खूष झाली म्हणून माझा अभिमान, इगो वाढेल. पण म्हणून त्या समागमातून निखळ आनंद मिळणं शक्यच नाही.''

''का?'' माझा मुद्दाम बावळट मठ्ठ विद्यार्थ्याच्या स्वरातला प्रश्न. पण हे ज्ञात्याच्या भूमिकेत दंग होते.

''का, काय विचारतेस? अग क्षणिक वासना उफाळून कसली तरी मीपणाची हौस पुरवून घेण्यासाठी घडलेला संबंध तो, तिथे एकमेकांबद्दल प्रेम, जिव्हाळा काय असणार? अशा समागमातल्या दोन्ही जोडीदारांना दुसरा आपल्यावर कसा खूष झाला असं वाटून प्रत्येकाचा 'इगो' वाढणार. मग फक्त शरीरं एकमेकांना मिळणार. वासनावेग संपल्यानंतर बायकोशी प्रतारणा केल्याची अपराधाची जाणीव, बायकोने परपुरुषाशी शय्यासोबत केली तर तिला बोलण्याचा गमावलेला अधिकार, ती हतबल भावना. परत हा चोरटा संबंध. त्याचा बडेजाव दुसऱ्याला सांगता न येण्यासारखा, कुणाला कळेल का ही भीती, संस्कारी मनात ठुसठुसणारी वेदना. मनातल्या मनात सर्व लपवून घरात वावरण्याची धडपड. थोडक्यात काय त्या क्षणैक मजेची अशी लक्तरं लक्तरं झाल्यावर कुठला आनंद उपभोगता येणार? तृप्ती अनुभवता येणार? मग कशाला अशा वासनांना डोक्यात शिरू द्यायचं? साधा कॉमनसेन्स आहे हा!''

'हा साधा कॉमनसेन्स' सहजपणे कळणाऱ्या माझ्या नवऱ्याची दृष्ट काढावी असं मला वाटून गेलं. माझा आनंद माझ्या मनात मावेना. म्हणून मी किंचित नाटकीपणे ह्यांना म्हटलं,

''ओ माय डिअर. तुमचे हे बोलणे ऐकून मी धन्य झाले. आणि मी आता निर्धास्तपणे 'लैंगिक वैवाहिक समस्या मार्गदर्शन चिकित्सालय' सुरू करू शकते!''

''काय?'' ह्यांनी चक्क ओरडून विचारलं. ''परत सांग!''

''अहो, असं शॉक बसल्यासारखं काय करताय?'' मी सांगू लागले. ''माझी स्त्री-पुरुष कामसंबंधाबद्दल जी मतं आहेत, म्हणजेच कामसंबंध ही लैंगिक ताण घालवण्यासाठी कधीही, कुठेही, कोणीही, कोणाबरोबरही करण्याची निव्वळ एक

क्रिया नाही, तर ते उत्स्फूर्तपणे परस्पर प्रेमभावापोटी एकमेकांना समर्पण करण्याच्या तीव्र ऊर्मीतून घडणारं मिलन आहे. आणि हेच बरोबर तुम्हीही सांगितलं.''

''म्हणजे कामभाव वा समागम हा पुरुषार्थ वा स्त्रीत्व सिद्ध करण्याचं मापन म्हणून वा सौदा, सूड, शिक्षा, अहंकार, तृप्ती वगैरेसाठी वापरला जाऊ नये. थोडक्यात मानवी कामभावाचा गैरवापर करू नये. कारण असा गैरवापर हितावह नसतोच, पण उलट त्याची शिक्षा म्हणून मग ह्या सर्व लैंगिक समस्याच व्यक्तीला ग्रासतात. म्हणून मी हे असं क्लिनिक सुरू करू इच्छिते.''

माझं बोलणं ऐकता ऐकता ह्यांचा धक्का हळूहळू ओसरत होताच. माझं बोलणं संपताच हे म्हणाले,

''म्हणजे चक्क आता 'कमजोरीकी दवा, लग्नापूर्वी गमावलेली ताकद परत मिळवा, निराश होऊ नका' अशी तूही जाहिरात देणार वर्तमानपत्रातून?''

ह्यांची ही चेष्टा होती की खरंच अज्ञानातून ते विचारत होते हे मला लगेच कळेना. म्हणून मी विचारलं,

''तुम्हांला असंच वाटतं का? म्हणजे मीही अशी जाहिरात देणार म्हणून?''

''नाही म्हणजे तशा जाहिराती पाहातोच की आपण वर्तमानपत्रांतून, अर्थात एम्.बी.बी.एस्. वा एम्.डी. अशा कोणत्या डॉक्टरांनी लैंगिक समस्यांची पाटी लावलेली बघितलेलीच नाही कधी.'' हे.

''बरोबर आहे. म्हणूनच मला अशा तऱ्हेची प्रॅक्टीस सुरू करायची आहे. जाहिराती देतात ते खरे प्रशिक्षित डॉक्टर्स नसतातच. निव्वळ भोंदुगिरी करून लोकांच्या अपराधी भावनेचा वा लाज शरमेचा फायदा घेऊन लुबाडणारे असतात आणि प्रशिक्षित डॉक्टर्स अशी प्रॅक्टीस करत नाहीत म्हणून मग अशा भोंदू नकली डॉक्टरांचं फावतं. तेव्हा निव्वळ लैंगिक क्रिया जमवण्याचा पेशन्टचा अट्टाहास शमवणं हा माझा क्लिनिक काढण्यामागचा हेतू नाही, तर व्यक्तीच्या कामशक्तीची त्याला योग्य ती ओळख करून देणं आणि त्याचा संयमित, जबाबदारीपूर्ण वापर कसा करायचा हे स्वास्थ्याच्या दृष्टीनं त्याला शिकवणं, त्याचे रूढ गैरसमज दूर करणं या हेतूने मला हे क्लिनिक चालवायचं आहे.'' – मी.

''अच्छा, ही तुझी क्रांती घडवणं वाटतं?'' ह्यांचा स्वर परत मूळपदावर आला होता, ''पण ह्यामागच्या उत्क्रांतीच्या घटना तू कधीच सांगितल्या नाहीस मला त्या!''

हे ह्यांचं म्हणणं खरं होतं.

आमचा संवाद चौऱ्याहत्तर सालामधला. दवाखाना सुरू करून त्यावेळेस मला जेमतेम चार-पाच महिने झाले होते. पण सुरुवातीलाच काही केसेस मला अशा बघायला मिळाल्या होत्या की त्या अगदी साध्या केसेस असूनही त्यांची चिकित्सा करताना माझंच वैद्यकीय ज्ञान मला अपुरं वाटू लागलं. नक्की काय आणि कशी कशी चिकित्सा करावी, ह्याच्याच गोंधळात मी पडले. म्हणजे रोगापेक्षा समस्यांनी पेशन्टस् जास्त पीडले आहेत हे स्पष्टपणे जाणवत होतं.

धातु जातो, अशक्तपणा वाटतो, कमजोरी वाटते, स्वप्नदोष होतो, टॉनिक्स द्या, इंजेक्शन द्या असं सांगणाऱ्या केसेस आल्या आणि काय करावं,अशी औषधं खरोखरच आहेत का? कोणती औषधं? अज्ञानाचं काय, ते कसं दूर करावं वगैरे विचारांनी मीच कमजोर पडत होते. अशा ह्या केसेस योग्य ज्ञान देऊन सुधारतात. बहुसंख्य डॉक्टर्स उगाचच कुठली तरी औषधं देऊन वा इंजेक्शन टोचून झटपट मोकळे होतात. मी मात्र अशा केसेसचा गंभीरपणे विचार करू लागले होते.

काही तरुण, अविवाहित मुली पाळी चुकली म्हणून आल्या अणि तपासणीत त्यांना गर्भधारणा झाल्याचं दिसून आलं. गर्भपाताशिवाय इलाजच नव्हता. त्यासाठी योग्य त्या स्त्रीरोग तज्ज्ञांकडे त्यांना पाठवलंही. पण वस्तुस्थिती लक्षात आल्यानंतर त्यांचे काळे ठिक्कर पडलेले चेहरे, भयभीत मन:स्थिती, एकंदर लैंगिक संबंधाबद्दलच्या, प्रजोत्पादनासंबंधीच्या गैरसमजुती, मजेनंतर तथाकथित प्रियकर जबाबदारी झटकून मोकळे झाल्यामुळे आलेली निराशा, भविष्याची भीती ह्यावर गर्भपात करणाऱ्या कुठल्याच स्त्रीरोग तज्ज्ञाने जबाबदारी वा कर्तव्य म्हणून उपचार केलेले नव्हते.

एका संबंध जमू न शकणाऱ्या जोडप्याला मी स्त्रीरोग तज्ज्ञाकडे पाठवलं, मार्गदर्शनासाठी. तर त्या स्त्रीरोग तज्ज्ञाने नवऱ्याला एका मानसोपचार तज्ज्ञाकडे पाठवलं. त्यांच्याकडून तो नवरा मूत्र-रोग तज्ज्ञांकडे, येथून स्वत: होऊन एका गुप्त रोग तज्ज्ञाकडे, आणि शेवटी कंटाळून एका भोंदू नकली डॉक्टरकडेही गेला. एकूण असा चार-पाच पहिने प्रवास झाला. रक्त, लघवी, वीर्य यांच्या तपासण्या झाल्या. एवढं करूनही कुठल्याच तज्ज्ञाने संबंध म्हणजे नक्की काय करायचं, संबंधापाठीमागचा खरा हेतू काय, प्रेरणा कोणत्या, पतीपत्नींनी शृंगार कसा जोपासावा वगैरे ज्या साध्या माहितीची त्या जोडप्याला खरी आवश्यकता होती ती माहिती दिलीच नव्हती.